# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


प्रेसनोट २१६-२२ दिनांक १८/०७/२०२२

## विरार येथील समय चौहान हत्या प्रकरणातील पाहिजे आरोपीत यास बिहार राज्यातील संवेदनशिल क्षेत्रातुन अटक करण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

दिनांक २६/०२/२०२२ रोजी १३.२५ वा. चे सुमारास श्रीकृष्ण फर्निचर समोरील रोडवर, भाजीपाला मार्केटच्या बाहेर, ९० फीट रोड, मनवेलपाडा, विरार (पू), ता. वसई, येथे इसम नामे - समरजित ऊर्फ समय विक्रमसिंह चौहाण रा. ठि.रुम नं. ए/१०१, अग्रवाल कॉम्प्लेक्स, गोकुळ हाईटस्चे बाजूला, डि मार्ट समोर, विरार (प), ता. वसई, जि. पालघर याची दोन अनोळखी आरोपीत यांनी भर दिवसा गोळया घालुन निर्घुण हत्या केली होती. सदर बाबत विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर व कलम २३२/२०२२, भा.दं.वि.सं कलम ३०२, २०१, २१२, १२० (ब) सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५, २७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर दाखल गुन्हयाची मा. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गंभीर दखल घेऊन गुन्हयातील आरोपीत निष्पन्न करुन त्यांचा शोध घेवुन अटक करणे बाबत गुन्हे शाखा यांना सुचना करण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे अद्यापपावेतो गुन्हयात १२ आरोपीत यांना निष्पन्न करुन त्यांना मुंबई, उत्तरप्रदेश, उत्तराखंड येथुन अटक करण्यात गुन्हे शाखेला यश आले आहे. अटक आरोपीत यांचा पुर्व गुन्हेगारी इतिहास व नमुद दाखल गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेऊन सदर गुन्हयातील अटक आरोपीत यांचे विरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम कलम ३ (१)(i), ३ (१) (ii), ३ (२), ३ (३), ३ (४) प्रमाणे (मकोका कायदया अंतर्गत) कारवाई करण्यात आली आहे.

नमुद दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपीत नामे - अखिलेश शैलेश तिवारी ऊर्फ राजु रा. घर नंबर ५९, नारायणपुर बुजुर्ग, पो.स्टे. केशवपार, पो. ठा- गोला, जि. गोरखपुर, उत्तरप्रदेश याचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्यापासुन उत्तरप्रदेश, दिल्ली, बिहार नेपाळ येथे आपले अस्तित्व लपवुन वास्तव्य करीत होता. तांत्रीक विश्लेषण व गोपणीय बातमीदार यांचेकडुन माहिती घेता तो कटिहार राज्य बिहार येथे वास्तव्यास असले बाबत गुन्हे शाखा कक्ष -३ यांना खात्रीशिर माहिती मिळाल्याने मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष -३ चे पथकाने सलग १५ दिवस उत्तर प्रदेश व बिहार राज्यातील विविध जिल्हयामध्ये अत्यंत प्रतिकुल परिस्थीतमध्ये आरोपीत अखिलेश शैलेश तिवारी ऊर्फ राजु याचा कसुन शोध घेवुन त्यास बिहार, पश्चिम बंगाल व झारखंड सिमा भागातील संवेदनशिल क्षेत्र मु.पो. मुज्वर, पो.ठा. मनिहारी, जि. कटीहार, राज्य बिहार येथुन दिनांक १४/०७/२०२२ रोजी कौशल्यपुर्वक ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे.

वरील कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अति कार्या. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, पो.हवा/ मनोज चव्हाण, पो.हवा/ शंकर शिंदे. पो.हवा/ सचिन घेरे, पो.हवा/ मुकेश तटकरे, पो.हवा./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.अं./ राकेश पवार, पो.अं/ अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ यांनी कठोर परिश्रम घेवुन उकृष्टरित्या पार पाडली आहे.